CNR-:MH-JG-05-003467-2022

दाखल तारीख : १०/१०/२०२२
नोंदणी तारीख : १०/१०/२०२२
निकाल तारीख : १५/११/२०२२
कालावधी : ००व. ०१म. ०५दि.

## ४थे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, जळगांव यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी ज.गु.पवार यांचे समोर)

**हिंदु विवाह याचिका क्रमांक २५९/२०२२ निशाणी २१**

रोहिणी गौतम गायकवाड,
वय – २७ वर्ष, धंदा – घरकाम,
द्वारा–पाळधी खु.।।,
रा. धरणगांव, जिल्हा जळगांव **...अर्जदार क्र. १**

**आणि**

गौतम एकनाथ गायकवाड,
वय – ३३ वर्ष, धंदा – मजुरी,
राहणार – वडगांव (टिघर),
ता. जामनेर, जिल्हा जळगांव. **...अर्जदार क्र. २**

अर्जदार क्र. १ तर्फे वकील आर.एस.शुक्ला
अर्जदार क्र. २ तर्फे वकील सी.झेड.कट्यारे

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक १५/११/२०२२)

अर्जदारांनी सदरचा अर्ज हिंदु विवाह अधिनियमाचे कलम १३(ब) नुसार परस्पर संमतीने विवाह विच्छेदनाचा हुकुमनामा पारीत करण्यासाठी सादर केलेला आहे.

**अर्जदारांचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे –**

२. अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ यांचा विवाह दिनांक २१.०१.२०१४ रोजी मौजे वडगांवटिगर, ता. जामनेर, जि.जळगांव येथे हिंदु धर्मशास्त्र व जाती रिवाजाप्रमाणे झालेला आहे. उभयंताना सदर लग्नसंबंधातुन कोणतेही अपत्य नाही. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ कडे नांदणेस गेली. तथापि, लग्नानंतर अर्जदार क्र. १ व २ यांनी कधीही पती–पत्नी म्हणून व्यवस्थीत संसार केला नाही. अर्जदार क्र. १ व २ यांचे विचार, आवडनिवड भिन्न असल्याने त्यांच्यात मतभेद होत होते. त्यांच्या दरम्यान किरकोळ कारणांमुळे पटत नव्हते व छोट्या छोट्या गोष्टींवरुन खटके उडत होते. अर्जदार क्र.१ व २ यांचेमध्ये वैचारीक मतभेद होवुन त्यांचे वैवाहीक नातेसंबंध विकोपाला गेले. अर्जदार क्र. १ व २ यांनी एकंदरीत साडे पाच वर्षे एकत्र संसार केला. शेवटी जुन २०१९ पासून अर्जदार क्र. १ ही माहेरी राहत आहे.

३. अर्जदार क्र. १ व २ यांच्यामध्ये समेट करण्याच्या हेतूने त्यांचे नातेवाईक व समाजातील जेष्ठ लोकांनी प्रयत्न केले. परंतु, त्याचा काहीही उपयोग झाला नाही. दरम्यानच्या काळात झालेल्या दुराव्यांमुळे दोघांच्या वैचारिक मतभिन्नता, विचारसरणी व परस्पर विरोधी विचारांमुळे एकमेकांचे जगणे अशक्य झाले. त्यामुळे त्यांना कळुन चुकले की त्यांचे एकमेकांसोबत राहणे अशक्य आहे. अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ यांचा संसार जोडण्याकरीता दोघांच्या नातेवाईकांनी प्रयत्न केले असता त्यांना त्यात यश आले नाही. त्यामुळे, दोघांचा संसार होणे शक्य नसल्याने आपसात संमतीने फारकत घेण्याचे ठरले.

४. अर्जदार क्र.१ व २ यांच्या दरम्यान समझोता व्हावा या हेतूने बरेच वेळा प्रयत्न झाले, परंतु त्यास यश आले नाही. दरम्यान अर्जदार क्र. १ व २ यांच्या अर्जदार क्र. १ हिचा भविष्यातील खावटीचा, अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार व निवारा हक्क कोणताही मोबदला न घेता सोडून देण्याचे त्यांच्यात ठरले आहे. अर्जदार क्र. २ हिने अर्जदार क्र. १ च्या स्थावर व जंगम मालमत्तेत निर्माण झालेले सर्व हक्क व अधिकार सोडून देत आहे. तसेच, लग्नातील दागीने, कपडेलत्ते, भांडी–कुंडी बाबत एकमेकांकडे काहीएक देणे घेणे राहीलेले नाही. अर्जदार क्र. १ व २ यांनी एकमेकांविरुध्द कुठल्याही फौजदारी अगर दिवाणी स्वरुपाच्या केसेस करावयाच्या नाहीत असे ठरले. अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ यांच्यामध्ये एकत्र संसार करण्याची कोठलीही शक्यता नसल्याने दोन्ही अर्जदारांनी विवाह विच्छेदनाचा हुकुमनामा पारीत करावा अशी विनंती केली. एकंदरीत, अर्जदार क्र. १ व २ हे एकत्र नांदतील अशी कोणतीही शक्यता दिसत नाही. तसेच, दोन्ही पक्षकार आपसी संमतीने विवाह विच्छेदनावर ठाम असल्याचे स्पष्ट दिसते.

५. अर्जदारांनी निशाणी क्र.०४ प्रमाणे अर्जदार क्र.१ व २ यांची लग्न पत्रीका नि.क्र. १८, अर्जदार क्र. १ व २ च्या आधार कार्डची प्रमाणित प्रत नि.क्र. १९ व २० वर दाखल केलेल्या आहेत. तसेच अर्जदार क्र.१ व २ यांनी अनुक्रमे निशाणी क्र.१५ व १६ वर शपथपत्र दिले की, अर्जदार क्र. १ व २ यांनी परस्पर संमतीने घटस्फोट मिळणे बाबतचा अर्ज दाखल केल्याचे व त्यातील मजकुर बरोबर असल्याचे शपथेवर कथन केले आहे.

६. अर्जदारांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार हे जुन २०१९ पासून वेगळे रहात आहेत. अर्जदारांवर कोणताही दबाव नाही. त्यांचेमध्ये समेट होउन एकत्र राहण्याची कोणतीही शक्यता नाही. करीता अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती अर्जदार क्र. १ व २ यांच्या जेष्ठ विधीज्ञांनी केली.

७. अर्जदारांचे अर्जावरुन खालील प्रश्न माझे विचारार्थ उपस्थीत होता, मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ व २ हे परस्पर संमतीने घटस्फोटाचा हुकूमनामा मिळणेस पात्र आहेत काय? | होय. |
| २. | आदेश का? | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र. १ व २ करीताः**

८. अर्जदारांचे पुराव्याचे व त्यांनी दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. त्यांनी असे कथन केले की, त्यांचा विवाह दिनांक २१.०१.२०१४ रोजी मौजे वडगांवटिगर, ता. जामनेर, जि.जळगांव येथे हिंदु धर्मशास्त्र व जाती रिवाजाप्रमाणे झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ कडे नांदणेस गेली. लग्नानंतर अर्जदार क्र. १ व २ यांनी कधीही पती–पत्नी म्हणून व्यवस्थीत संसार केला नाही. तसेच, त्यांचे विचार, आवडनिवड भिन्न असल्याने त्यांच्यात मतभेद होवून किरकोळ कारणांमुळे त्यांच्यात पटत नव्हते. उभयतांमध्ये छोट्या छोट्या गोष्टींवरुन खटके उडत होते. अर्जदार क्र.१ व २ यांचेमध्ये वैचारीक मतभेद होवुन त्यांचे संबंध विकोपाला गेले. उभयतांनी एकंदरीत साडे पाच वर्षे एकत्र संसार केला. शेवटी जुन २०१९ पासून अर्जदार क्र. १ ही माहेरी राहत आहे.

९. दरम्यानच्या काळात अर्जदार क्र. १ व २ यांच्यात समाजातील मध्यस्थांमार्फत समेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न झाले. परंतु, उभयतांनी एकमेकांपासून विभक्त होण्याचा निर्णय घेतला. यापुढे दोघे पती–पत्नी म्हणून एकत्र राहु शकणार नाहीत अशी खात्री झाल्याने त्यांनी वैवाहिक संबंध संपुष्टात आणण्याचे ठरवले. अर्जदार क्र.१ व २ यांना न्यायालयामार्फत विचारणा करण्यात आली तेव्हा

दोघेही अर्जदारांनी एकत्र नांदावयाचे नाही असे ठामपणे सांगितले. दोघेही अर्जदारांवर कोणत्याही प्रकारचा दबाव अथवा प्रलोभन नसल्याची खात्री करण्यात आली.

१०. दरम्यान अर्जदार क्र. १ व २ यांच्या अर्जदार क्र. १ हिचा भविष्यातील खावटीचा, अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार व निवारा हक्क कोणताही मोबदला न घेता सोडून देण्याचे त्यांच्यात ठरले आहे. अर्जदार क्र. २ हिने अर्जदार क्र. १ च्या स्थावर व जंगम मालमत्तेत निर्माण झालेले सर्व हक्क व अधिकार सोडून देत आहे. तसेच, लग्नातील दागीने, कपडेलत्ते, भांडी–कुंडी बाबत एकमेकांकडे काहीएक देणे घेणे राहीलेले नाही. अर्जदार क्र. १ व २ यांनी एकमेकांविरुध्द कुठल्याही फौजदारी अगर दिवाणी स्वरुपाच्या केसेस करावयाच्या नाहीत असे ठरले. अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ यांच्यामध्ये एकत्र संसार करण्याची कोठलीही शक्यता नसल्याने दोन्ही अर्जदारांनी विवाह विच्छेदनाचा हुकुमनामा पारीत करावा अशी विनंती केली.

११. अर्जदार क्र. १ व २ यांनी दाखल केलेल्या शपथपत्रावरुन, मध्यस्थी अहवालावरुन व न्यायालयासमक्ष कथन केल्याप्रमाणे अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ यांच्यामध्ये समेट घडवुन येणे शक्य नाही असे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ हे एकत्र पती पत्नी म्हणुन संसार करु इच्छीत नाही असे सिध्द झाले आहे. त्यामुळे, हिंदु विवाह अधिनियम १९५५ चे कलम १३ (ब) नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता झाल्याचे निष्पन्न झाल्यामुळे अर्जदार क्र. १ व २ यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे विवाह विच्छेदनाच्या अनुषंगाने हुकूमनामा पारीत करणे न्यायोचित होत आहे. करीता, प्रश्न क्र. १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी देत आहे. करीता, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ रोहिणी गौतम गायकवाड, अर्जदार क्र. २ गौतम एकनाथ गायकवाड यांचा दिनांक २१.०१.२०१४ रोजी झालेला विवाह परस्पर संमतीने हिंदु विवाह अधिनियमाचे कलम १३(ब) नुसार आदेशाच्या तारखेपासुन विच्छेद झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च उभयपक्षकारांनी आपआपल्या परीने सोसावा.

४. येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय घोषित करण्यात आला.)

दिनांकः–१५/११/२०२२.

(ज.गु.पवार)
४थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
जळगांव.